# कुलाबा-सीप्झ मेट्रोबाधितांचे पुनर्वसन सहा महिन्यांनंतर

## अश्विनी भिडे यांची माहिती

मुंबई, ता. २२ : कुलाबा-वांद्रे-सीप्झ या मेट्रो-३ प्रकल्पातील काळबादेवी-गिरगावच्या प्रकल्पबाधितांचे पुनर्वसन ते राहत असलेल्या ठिकाणीच करण्यात येणार आहे. पुनर्वसनाचे काम सहा महिन्यांनंतर सुरू होईल, अशी माहिती एमएमआरसीच्या व्यवस्थापकीय संचालक अश्विनी भिडे यांनी मंगळवारी (ता. २२) दिली.

पुनर्वसनासाठी मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनने (एमएमआरसी) जी. डी. सांभारे आणि आर. एच. माहिमतुरा या वास्तुविशारदांची नेमणूक केली आहे. प्रकल्पबाधितांच्या पुनर्वसनाबाबत एमएमआरडीएच्या मुख्यालयात घेतलेल्या पत्रकार परिषदेत भिडे बोलत होत्या.

वास्तुविशारदांच्या नियुक्तीसाठी एमएमआरसीने जूनमध्ये निविदा मागवल्या होत्या. मेट्रो-३ च्या भूमिगत स्थानकांचे बांधकाम, प्रवेश-निकासद्वार, पूरक इमारती, वायुविजन स्तंभ आदींसारख्या कामांकरिता काळबादेवी-गिरगावमधील सुमारे १९ इमारतींची जागा लागणार आहे. या कामामुळे इमारतीमधील २९३ निवासी आणि ३४१ व्यापारी गाळे तात्पुरते बाधित होणार असल्याचेही भिडे यांनी सांगितले. या इमारतींच्या पुनर्वसनाचे काम मेट्रो प्रकल्प सुरू असतानाच हाती घेण्यात येणार आहे. २०२१ पर्यंत नागरिकांना पुन्हा पुनर्विकसित इमारती देण्याचे नियोजन असल्याचेही भिडे म्हणाल्या.

### गणेशभक्तांची काळजी

दक्षिण मुंबईतील गणेश मंडळांच्या मंडपांना मेट्रो कामाचा त्रास होणार नाही. याची विशेष काळजी घेतली जाईल. गर्दी नियंत्रित करण्यासाठी लावलेले बॅरिकेडस् हटवण्यात येतील. गणेशोत्सवात मेट्रोच्या कामाची गणेशभक्तांना अडचण होणार नाही, याची काळजी घेतली जाईल, असेही अश्विनी भिडे म्हणाल्या. सांताक्रूझमधील गणेश मंडळाच्या मंडपाचा प्रश्न सोडवण्यात आल्याचेही त्यांनी सांगितले.